**ठळक बातम्या**

- पहिल्या यादीत विद्यमान ८ पैकी ७ खासदारांना एकनाथ शिंदेंकडून पुन्हा उमेदवारी
- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या ८८ जागांसाठी अर्ज भरायला सुरुवात
- २०१७ ते २०२१ या काळातल्या प्राप्तीकर विवरण पत्राच्या फेरतपासणीला आव्हान देणारी काँग्रेसची याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली
- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कोठडीत १ एप्रिलपर्यंत वाढ

**आणि**

- पीएचडीसाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा न घेता नेट परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्याच्या युजीसीच्या सूचना

**<><><><><>**

शिवसेनेनं ८ लोकसभा उमेदवारांची पहिली यादी आज संध्याकाळी जाहीर केली. त्यात ७ विद्यमान खासदारांना पुन्हा संधी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. दक्षिण मध्य मुंबईतून राहुल शेवाळे, कोल्हापुरातून संजय मंडलिक, शिर्डीतून सदाशिव लोखंडे, बुलडाण्यातून प्रतापराव जाधव, हिंगोलीतून हेमंत पाटील, मावळमधून श्रीरंग बारणे आणि हातकणंगलेतून धैर्यशील माने या विद्यमान खासदारांना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा उमेदवारी दिली आहे. रामटेकमध्ये विद्यमान खासदार कृपाल तुमणे यांच्याजागी आधीच राजू पारवे यांची उमेदवारी जाहीर झाली असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे.

शिंदे यांच्यासोबत असलेले कल्याणचे श्रीकांत शिंदे, वायव्य मुंबईचे गजानन किर्तीकर, नाशिकचे हेमंत गोडसे, पालघरचे राजेंद्र गावित आणि यवतमाळ-वाशिमच्या भावना गवळी यांचं नाव पहिल्या उमेदवार यादीत नाही.

**<><><><><>**

हिंदी चित्रपट सृष्टीतले अभिनेता आणि माजी खासदार गोविंदा यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. २००४ त्या २००९ या काळात गोविंदा काँग्रेसचे खासदार होते.

**<><><><><>**

रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीनं अवैध ठरवलं आहे.

ही कारवाई राजकीय सुडबुद्धीतून केलेली आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

**<><><><><>**

भाजपाचे काही नेते संविधान बदलण्याचं वक्तव्य करत असल्याचं सांगत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जर कुणी संविधान बदलण्याची भाषा केली तर मंत्रीपदाचा राजीनामा देईन, असा इशाराही त्यांनी दिला आहे. ते आज पुण्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात देशभरातल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे येत्या २६ एप्रिलला मतदान होणार आहे. महाराष्ट्रात ८ जागांवर मतदान होणार आहे. त्यात यवतमाळ- वाशिम,

बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, हिंगोली, नांदेड, आणि परभणी या मतदारसंघांचा समावेश आहे. या टप्प्यातल्या निवडणूकासाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली असून अर्ज भरण्याची शेवटची तारीख ४ एप्रिल आहे. ८ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी बिहारमधे, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. गया, औरंगाबाद, नवादा आणि जमुई या चार जागांसाठी एकूण ११० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्जांची छाननी येत्या ३० तारखेला होणार असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २ एप्रिलपर्यंत आहे.

**<><><><><>**

केरळमधे आज पहिल्या दिवशी १४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. त्रिपुरामधे पहिल्या दिवशी त्रिपुरा पूर्व मतदारसंघातून भाजपा उमेदवार किर्तीसिंग देब बर्मा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तिथं पहिल्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी आज झाली, त्यात सर्व ९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.

मणिपूरमधल्या दोन्ही मतदार संघांसाठी पहिल्या टप्प्यातच निवडणूक होणार असून, तिथं आज उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. त्यात १० अर्ज अवैध ठरले, तर १ उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला होता.

आसाममधे उमेदवारी अर्जांच्या छाननीत ३६ उमेदवारांचे अवैध आढळले, तर दोघांचे अर्ज फेटाळण्यात आले.

**<><><><><>**

भाजपा आणि सुदेश महतो यांच्या नेतृत्वाखालच्या ऑल झारखंड स्टुडण्ट्स युनियन यांच्यात जागावाटपाची बोलणी निश्चित झाली आहेत. भाजपा १३ जागा लढवणार असून ऑल झारखंड स्टुडण्ट्स युनियन गिरिडीह मतदारसंघातून लढणार आहे. भाजपचे सरचिटणीस अरुण सिंग यांनी समाजमाध्यमावरील संदेशात ही घोषणा केली.

<><><><><>

ओडिशामधल्या कटकचे खासदार भर्तृहरी महताब यांनी आज भाजपात प्रवेश केला.  काही दिवसांपूर्वी ते बिजू जनता दलातून  बाहेर पडले होते. महताब यांच्या पक्षप्रवेशाच्या वेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, पक्षाचे सरचिटणीस  विनोद तावडे, तसंच  भाजपाचे अनेक वरिष्ठ नेते  पक्षाच्या नवी दिल्ली इथल्या  मुख्यालयात उपस्थित होते.

<><><><><>

२०१७ ते २०२१ या चार वर्षांच्या काळात काँग्रेसवर आकारण्यात आलेल्या प्राप्तीकराच्या फेरतपासणीला आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या नेतृत्वाखालच्या पीठानं आज हा आदेश दिला. २०१४-१५ ते २०१६-२०१७ या वर्षांमधे आकारण्यात आलेल्या प्राप्तीकराची फेरतपासणी करण्याला आव्हान देणारी काँग्रेसची याचिका न्यायालयानं गेल्याच आठवड्यात फेटाळली होती. तेच आदेश गेल्या चार वर्षांसाठीच्या याचिकांनाही लागू राहतील, असं उच्च न्यायालयानं  सांगितलं.

<><><><><>

इतरांची निंदा करणं आणि खिल्ली उडवणं ही काँग्रेसची जुनी  संस्कृती असल्याची टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. भारताचे सरन्यायाधीश धनंजय

चंद्रचूड यांना वकिलांच्या एका गटानं लिहिलेल्या पत्राचा संदर्भ देत समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये त्यांनी हे लिहिलं आहे. वकिलांच्या गटानं देशाच्या न्यायपालिकेची निष्पक्षता खंडित होत असल्याची चिंता व्यक्त केली होती.

हरीश साळवे, मनन कुमार मिश्रा आणि पिंकी आनंद यांच्यासह देशातल्या काही प्रमुख वकिलांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहिलं होतं. देशातला एक गट स्वार्थासाठी न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचा, न्यायालयीन प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा आणि चुकीचे तर्क आणि राजकीय उद्दिष्टांच्या आधारावर न्यायालयांची बदनामी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी या पत्रात केला आहे.

**<><><><><>**

देशात महिला आणि मुलांवरच्या वाढत्या गुन्ह्यांवरून काँग्रेसनं भाजपावर जोरदार टीकास्त्र सोडलं. बृजभूषण सिंग यांच्यावर भाजपानं अद्याप कोणतीही कारवाई का केली नाही, असा सवाल महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना केला. बनारस हिंदू विद्यापीठाच्या विद्यार्थिनीवर झालेल्या सामूहिक अत्याचाराच्या घटनेत सहभागी असणाऱ्या भाजपच्या आयटी सेलच्या पदाधिकाऱ्यांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

**<><><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची कोठडी दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयानं येत्या १ एप्रिलपर्यंत वाढवली आहे. दिल्ली उत्पादनशुल्क धोरणाशी संबंधित कथित गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने गेल्या गुरुवारी म्हणजेच २१ मार्चला अरविंद केजरीवाल यांना अटक केली. न्यायालयाने त्यांना आजपर्यंत ईडी कोठडी दिली होती. ती संपल्यावर ईडीने आज पुन्हा त्यांना

न्यायालयात हजर केलं. अटकेला आव्हान देणारा अर्ज केजरीवाल यांनी दाखल केला असून विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी त्यावर ईडीला नोटीस बजावली.

**<><><><><>**

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठांनी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ नेट परीक्षेचे गुण, म्हणजेच  राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे निर्देश युजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. त्यानुसार पीएचडी अभ्यासक्रमासाठी विविध विद्यापीठं आणि उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांऐवजी केवळ नेट परीक्षेचा निकाल ग्राह्य धरला जाईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सचा आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरू आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या ७ षटकात २ बाद ३१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज दमदार तेजी नोंदवली. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सनं ७४ हजार १९० अंकांना स्पर्श केला होता. सार्वकालिक उच्चांकांच्या तुलनेत ही पातळी केवळ ५५ अंकांनी कमी आहे.

निफ्टीनं व्यवहारादरम्यान २२ हजार ५१६ अंकांना स्पर्श केला. सार्वकालिक उच्चांकापेक्षा ही पातळी केवळ १० अंकांनी कमी होती. दिवसअखेर मात्र दोन्ही निर्देशांकांत या पातळीच्या तुलनेत थोडी घसरण झाली. सेन्सेक्स ६५५ अंकांनी वधारून  ७३ हजार ६५१ अंकांवर तर निफ्टी २०३ अंकांची वाढ नोंदवून २२ हजार ३२७ अंकांवर स्थिरावला.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ मार्च २०२४ - गुरुवार

**//<><><><><>//**